आजच पाठवावे

# नागपूर विद्यापीठ

क्रमांक एसटीटी / एम / एल / २२४
दिनांक : २८ जुन. 2002

1. विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख.
2. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य.
3. विद्यापीठ संचालीत महाविद्यालय / संस्थेचे प्राचार्य / संचालक.

विषय : विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालीत महाविद्यालयातील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रवेशासबंधीच्या निवड याद्या तयार करण्याची कार्यपध्दती.

संदर्भ.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरुन विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालीत महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तयार करण्यासबंधी खालील प्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

सर्वप्रथम प्रवेशासाठी अर्ज केलेल्या सर्व पात्रताधारक विद्यार्थ्यांची (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसह) गुणवत्तेनुसार / गुणांकानुसार यादी तयार करावी. एकुण प्रवेश क्षमतेच्या 50 टक्के विद्यार्थी संख्या ही खुल्या प्रवर्गातुन प्रवेशासाठी पात्र ठरत असल्याने प्रवेश क्षमतेच्या 50 टक्के विद्यार्थ्यांचा सर्वप्रथम निवड यादीत समावेश करावा. मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या वरील खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीत समावेश असल्यास त्यांना खुल्या प्रवर्गातुन प्रवेश देण्यात यावा. त्यांचा समावेश मागासवर्गीय प्रवर्गासाठी तयार केलेल्या यादीत करण्यात येवू नये.

वरील खुल्या प्रवर्गातील यादीत समाविष्ट असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या नंतर खालोखाल गुणवत्ता / गुणांक प्राप्त केलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची खालील टक्केवारीनुसार प्रवर्गनिहाय निवड यादी तयार करावी व त्याप्रमाणे प्रवेश द्यावा.

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती – | 13 टक्के |
| अनुसूचित जमाती – | 7 टक्के |
| विमुक्त जाती (अ) – | 3 टक्के |
| भटक्या जमाती (ब) – | 2.5 टक्के |
| भटक्या जमाती (क) – | 3.5 टक्के |
| भटक्या जमाती (ड) – | 2 टक्के |
| इतर मागासवर्ग – | 19 टक्के |

शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक / निर्णयानुसार अपंग, सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले (ॲक्टीव सर्व्हीसेस) / कर्मचारी तसेच माजी सैनिक यांची पाल्ये व अवलंबित, इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या विहित टक्केवारीनुसार त्यांच्या संबंधीत खुल्या किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील राखीव जागांमधून आडवे (Horizontal) आरक्षण देण्यात यावे.

गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहील्यास त्या जागापैकी एकुण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त 2 टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय (S.B.C.) उमेदवारास गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही करावी.

5) दर्शविल्याप्रमाणे 2 टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय उमेदवारास प्रवेश देऊनही परिशिष्ट 2 मध्ये दर्शविलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात त्यांना विहित केलेल्या टक्केवारीनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या मागासवर्गीयांच्या इतर प्रवर्गातून गुणवत्तेनुसार खालील गटाअंतर्गत आंतरबदल (inter-changability) तत्वानुसार भरण्यात याव्या.

गट 1
- (i) अनुसूचित जाती
- (ii) अनुसूचित जमाती

गट 2
- (i) विमुक्त जाती (अ)
- (ii) भटक्या जमाती (ब)

गट 3
- (i) भटक्या जमाती (क)
- (ii) भटक्या जमाती (ड)
- (iii) इतर मागासवर्गीय

6) एकुण प्रवेश क्षमतेच्या 30 टक्के जागावर महिलांचा प्रवेश देणे आवश्यक असल्याने, खुला व राखीव प्रवर्गात 30 टक्के जागांवर महिलांना प्रवेश मिळेल याबद्दल दक्षता घ्यावी.

7) मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार शैक्षणिक सत्र 2002-2003, पासून वरील कार्यपध्दती अवलंब करुन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

आपला,

(सुभाष बेलसरे)
कुलसचिव,
नागपूर विद्यापीठ.

प्रतिलीपी माहितीस्तव :

1) सहायक कुलसचिव (सामान्य प्रशासन), नागपूर विद्यापीठ
2) सहायक कुलसचिव (महाविद्यालयीन शाखा).
3) सहायक कुलसचिव (गडचिरोली उपकेंद्र), गडचिरोली

R.L.M. Mahavidyalaya Sawargaon

Principal
R.L.M. College
Sawargaon